PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 5, ISSUE 2

# कोरोना महामारीच्या काळात भारतीय शिक्षण प्रक्रियेचे बदलते स्वरूप

**डॉ. एस. एन. बरडे**
सहयोगी प्राध्यापक
जनता शिक्षण महाविद्यालय चंद्रपूर
**महाराष्ट्र भारत.**

कोरोना महामारीला नियंत्रित ठेवण्यासाठी जगातील अनेक राष्ट्रांनी टाळेबंदी केली. या टाळेबंदीमुळे वेगाने धावणारे जग एकदम थांबल्यागत झाले. भारतातही टाळेबंदी टप्प्या टप्प्याने वाढत गेली. आजपर्यंत जवळपास पाच टप्पे टाळेबंदीने गाठले आहेत. मार्च महीण्याच्या शेवटच्या आठवड्यापासून सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ व इतर शैक्षणिक संस्थांचे कामकाज बंद झाले. शाळांतील विद्यार्थी व महाविद्यालयातील शिक्षक सद्या घरात बंदीस्त स्वरूपात असल्यासारखे आहेत. शिक्षक विद्यार्थ्यांची चालणारी प्रत्यक्ष आंतरक्रीया खंडीत झालेली आहे. कोरोना महामारीच्या प्रकोपातून केंव्हा बाहेर पडू? ह्याबाबत सर्वत्र अनिश्चितता आहे. ज्या भागात कोरोनाचा प्रादुर्भाव कमी आहे त्या भागातील टाळेबंदीत शिथिलता आणण्याचे कार्य केंद्र सरकार व संबंधित राज्य सरकारे करीत आहे. परंतु अजूनही विमानसेवा, रेल्वेसेवा, मेट्रो वाहतूक सुरू झालेली नाहीत. भारतातील जवळपास 15 लाखापेक्षा शाळा व 50 हजारांपेक्षा जास्त उच्च शैक्षणिक संस्था कोरोना महामारीमुळे प्रभावीत झालेल्या आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसार पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम सेमिस्टर वा प्रवेशित विद्यार्थ्यांच्याच परीक्षा होणार आहेत. त्या कशा घ्यायच्या हे संबंधित राज्यांकडे सोपविण्यात आले आहे.

शाळेतील 9 वी व 11 वीच्या विद्यार्थ्यांना प्रमोट करण्यात आले आहे. कोरोनाची समस्या लवकरच निकालात निघेल या बाबतीत सर्वजन साशंक आहेत. त्यामुळे कोरोनाशी लढा देत पुढे सर्वच


VOL 5, ISSUE 2 www.puneresearch.com/world JUNE - AUG 2020
(IMPACT FACTOR 3.02) INDEXED, PEER-REVIEWED / REFEREED INTERNATIONAL JOURNAL

क्षेत्रात वाटचाल करावी लागणार आहे. कार्पोरेट कंपन्यानी आपल्या नोकरदार वर्गाला वर्क फ्राम होम चे निर्देश दिले आहेत. आणि प्रत्यक्ष कार्यालयात न जाता कंपन्यांची कामे सुरू आहेत.

**शिक्षण व्यवस्थेत होवू घातलेला बदल :**

कोरोना महामारीपासून वाचण्यासाठी प्रत्यक्ष संपर्कात येणे टाळायचे असल्यामुळे ब-याच शैक्षणिक संस्थांनी ऑन लाईन अध्यापनाचे कार्य सुरू केले आहे. ह्या प्रक्रियेत शिक्षक आणि विद्यार्थी प्रत्यक्षात एकमेकांसमोर नसतात परंतु आपण अध्यापनाचे उद्दिष्ट साध्य करू शकतो. सद्याची असलेली परिस्थिती जेंव्हा सुरळीत होईल तोपर्यंत ऑन लाईन अध्ययन – अध्यापनाचा मार्ग चोखाळून अपेक्षित उद्दिष्ट गाठता येईल. परंतु सर्वच विद्यार्थी अशा पद्धतीने शिक्षण घेण्यास अनुकूल नाहीत. कारण प्रत्येक विद्यार्थ्याजवळ लॅपटॉप, संगणक, आंतरजाल मांडणीची उपलब्धता नसते. शहरी भागातील विद्यार्थी ह्या पद्धतीत ज्ञानार्जन करू शकतील परंतु ग्रामिण भागातील, दुर्गम भागातील, आदीवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी ही पद्धती सोयीची ठरणारी नाही. जोपर्यंत केंद्र सरकार व राज्यसरकारे ऑन लाईन पद्धतीने शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असणा-या बाबींची मुबलक प्रमाणात उपलब्धता करून देत नाही, तोपर्यंत या पद्धतीने ग्रामिण दूर्गम भागातील विद्यार्थी अध्ययन करू शकणार नाहीत.

कोरोना महामारीची परीस्थिती उद्भवण्याच्या अगोदर सत्ताधारी केंद्रसरकारने डिजिटल इंडियाचे जे धोरण अवलंबिले होते, त्या धोरणाचा लाभ निश्चितच काही प्रमाणात विद्यार्थ्यांना मिळेल. शिक्षण पद्धतीतील अपेक्षित ध्येय पुर्तीसाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी कोरोना महामारी निमित्त निर्माण झालेली परिस्थिती एक उत्तम संधी आहे. ऑन लाईन अध्ययन अध्यापन आणि मूल्यमापनासाठी नवनवीन सुधारीत व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यासाठी ही उत्तम वेळ आहे असे म्हणता येईल. विद्यार्थ्यांच्या – शिक्षकांच्या आरोग्याचा विचार करता ही पद्धती निश्चितच प्रभावी ठरते आहे.

ब-याचदा या अगोदर प्रभावी वर्गाध्यापनाविषयी ऑन लाईन अध्ययन–अध्यापनासाठी उपयुक्त साधना विषयी आपण खूप चर्चा केली आहे परंतु हीच वेळ आहे जेंव्हा या सर्वांचा पुरेपूर वापर करता येवू शकतो, व शिक्षक व विद्यार्थ्यांत प्रत्यक्ष वर्गाध्यापनाचा लाभ घेण्याची आभासी व्यवस्था निर्माण करू शकतो. याच पद्धतीचा वापर करून पालक सभा, शिक्षकांच्या सभा, व्यवस्थापन पदाधिका-यांच्या सभा आयोजित करून पैशाची बचत करू शकतो व अपेक्षित उद्दिष्टांची पूर्तता करू शकतो. झूम, वेबेक्स, गुगल अशा ब-याचशा ॲपच्या माध्यमातून आभासी सभांचे आयोजन करण्यात येत आहेत. वेबिनार च्या माध्यमातून महत्वांच्या विषयावर चर्चासत्रे, परीसंवाद, अधिवेशनांचे आयोजन करण्यात येत आहे. मनुष्य बळ विकास मंत्रालय, एन.सी.ई.आर.टी. तांत्रिक शिक्षणाचे वेगवेगळ्या विभागामार्फत या पद्धतीने

जनसमुहाशी संपर्क साधण्यात येत आहे. शिक्षकासाठी स्वयं ऑनलाईन अभ्यासक्रम e पी. जी. पाठशाळा, C.E.C.-U.G.C., यू ट्यूब चॅनेल इत्यादीच्या कार्यक्रमाद्वारे याची सुरवात झालेली आहे. या पद्धतीने भारतातील कोणत्याही ठीकाणी असणारा विद्यार्थी उत्तम शिक्षकांकडून ज्ञान प्राप्त करू शकतो, फक्त त्या अभ्यासक्रमाची नोंदणी तो करू शकला पाहीजे. ह्या सर्व पद्धती प्रत्यक्षात खोलवर रूजण्यासाठी धोरण निर्मिती करणारे सभासद, शासनाचे प्रमुख, शिक्षण तज्ञ, विद्यार्थी या सर्वांच्या मनोवृत्तीत, त्यांच्या विचार पद्धतीत आमुलाग्र बदल घडून आला पाहीजे, तरच डिजिटल भारताचे स्वप्न पूर्ण करता येईल. कोरोना महामारीमुळे फक्त याला चालना मिळावी असे म्हणता येते.

नुकतेच लोकमत तर्फे "कोविडनंतरच्या जगात उच्च शिक्षण, आव्हाने, संधी व कल" या विषयावर वेबीनार चे आयोजन करण्यात आले होते. ज्वलंत समस्येवर या वेबीनारचे आयोजन केले गेले असल्यामुळे शिक्षण क्षेत्रातील सर्वच संबधितांचे यावर होणाऱ्या चर्चेकडे लक्ष होते. या वेबीनार मध्ये नितीन करमळकर कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. पी. डी. पाटील कुलगुरू, डी. वाय. पाटील विद्यापीठ, डॉ. विद्या येरवडेकर, प्रधान संचालिका व प्र–कुलगुरू सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, डॉ. विश्वजित कदम सचिव व प्र–कुलगुरू भारती विद्यापीठ, डॉ. स्वाती मुजूमदार प्र–कुलगुरू सिम्बायोसिस कौशल्य व व्यावसायिक विद्यापीठ डॉ. मंगेश कराड, कार्यकारी अध्यक्ष, एम.आय.टी., ए.डी. टी. विद्यापीठ या सर्व नामवंत तज्ञांनी भाग घेतलेला होता. त्यांनी या वेबिनार मध्ये मांडलेल्या काही ठळक बाबी, सूचना याप्रमाणे आहेत.

(1) येणाऱ्या सत्रात सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याची व सुरक्षिततेची काळजी शैक्षणिक संस्थाकडून घेतल्या जाईल असा विश्वास पालकांमध्ये निर्माण केला गेला पाहीजे.

(2) अत्याधुनिक ज्ञानाने परिपूर्ण असल्याशिवाय ऑन लाईल शिक्षण घेता येणार नाही.

(3) उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांनी परदेशात न जाता आपल्या भारतातील विद्यापीठाशी ज्या बाहेरील देशातील विद्यापीठांनी समंजस्य करार केलेला आहे त्यांच्या मार्फत शिक्षण प्राप्त करावे.

(4) अध्यापकांना ब्लेंडेड पद्धतीने अध्यापन करावे लागेल. अध्ययनार्थी काही भाग शैक्षणिक संस्थामध्ये शिकतील तर काही भाग ऑन लाईन पद्धतीने शिकतील. ऑनलाईन पद्धतीने कुठेही म्हणजे विद्यार्थ्यांच्या घरी, वसतीगृहात घेता येईल.

(5) ऑनलाईन शिक्षणातूनही शिक्षक विद्यार्थी संवाद वाढावा यासाठी प्रयत्नशील राहावे लागेल.

(6) प्रत्येक अध्यापकाला आपल्या विषयाशी संबंधित ज्ञानाने अद्यावत राहावे लागेल. जे शिक्षक नाविन्यतेशी जूळवून घेणार नाहीत ते सर्व निश्चितच या प्रक्रियेतून बाहेर फेकले जातील.

(7) पाश्चिमात्य राष्ट्रातील विद्यापीठाद्वारे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑन लाईन शिक्षण घेण्यासाठी प्रेरीत करावे लागेल.

(8) कोरोना ने उद्‌भलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी सर्वच शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या संस्थेत प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता स्वच्छतेसंदर्भात, शारीरिक अंतर राखण्यासंदर्भात विद्यार्थ्यांच्या बसण्याच्या व्यवस्थेच्या संदर्भात सामाजिक नियमावली तयार करावी लागेल.

(9) शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन करणाऱ्या ज्या संस्था आहेत जसे एन. बी. ए., नॅक, एन.सी.टी.ई., क्यु. सी. आय. अशा विविध संस्थांद्वारे ऑनलाईन अभ्यासक्रमांचे मूल्यांकन करून त्यांचा पण दर्जा निर्धारीत करण्यात यावा.

(10) ऑनलाईन पद्धतीने मेडीकल व इंजिनिअरींगच्या विद्याथ्याना शिक्षण देण्यासाठी उच्च दर्जाच्या अभ्यासक्रमांची निर्मिती करावी लागेल.

(11) शैक्षणिक संस्थांचे डिजिटलायझेशन करण्यासाठी डिजिटल टॉन्सफार्मेशन मॅनेजर, ऑन लाईन वर्कफोर्स मॅनेजमेंट अशा स्वरूपाचे काम करण्यासाठी मनुष्यबळाची निर्मिती करावी लागेल.

कोरोना महामारीमुळे उद्‌भवलेल्या शैक्षणिक क्षेत्रातील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी राष्ट्रीय, राज्य, विद्यापीठ स्तरावर प्रयत्न सुरू झालेले आहेत. या सर्व प्रयत्नांचे सकारात्मक परीणाम येणाऱ्या काळात आपल्याला दिसतीलच, कोरोना महामारी सारखी कितीही संकट आली तरी शिक्षणक्षेत्राशी संबंधित प्रत्येक व्यक्ती निश्चितच या परीस्थितीवर मात करेल व शैक्षणिक उद्दिष्टे गाठण्याच्या प्रक्रियेत फक्त बदल झाला असेच समजावे लागेल, संबंधितांना ह्या बदललेल्या प्रक्रियेशी समरस होवून अपेक्षित उद्दिष्टे गाठावी लागतील.

## संदर्भ

(1) www.ecpvpvetiones.india times.com
(2) www.india today.in
(3) www.world sofeducation.org
(4) Lokmat you tube channel